**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.१९/०५/२०१९**
**दि.१८/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३६८/१९,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | सुबराव लाड,पोलीस उप-निरीक्षक, भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे |
| **आरोपी** | एक ठेकेदार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०५/२०१९ रोजी १९/०४ वा. वाघजाईनगर मंदिरा जवळ,भिलारेवाडी कात्रज,पुणे येथे बांधकाम चालु असलेल्या बिल्डींगचे पार्कीग मध्ये |
| **तपशिल** | भारती विद्यापीठ पो स्टे अ.मयत रजि.नं.८७/१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,वाघजाईनगर मंदिरा जवळ,भिलारेवाडी कात्रज,पुणे येथे बांधकाम चालु असलेल्या बिल्डींगचे बांधकामाचे देखरेखीचे व रखवालीदाराचे कामाची जबबादारी यातील नमुद इसम ठेकेदार याची असताना,सदर ठेकेदाराने बिल्डींगच्या पार्किंग मध्ये जमिनीच्या खाली असणा-या पाण्याचे टाकीला कुलप लावुन,ती बंद करुन न ठेवता,कामगारांचे मुलांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन उघडया पाण्याचे टाकीवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे, मुलगा कु.स्वराज माधव खवले,वय-११ वर्षे,रा.भिलारेवाडी कात्रज,पुणे हा त्याचे मित्रांच्या सोबत खेळत असताना,तो पाण्याच्या टाकीत पडुन मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १२५/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८ वर्ष,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात फेसबुक, व्हाटसअ्प मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०८/२०१८ रोजीपासुन ते दि.१७/०५/२०१९ रोजीचे कालावधीत वॉटसअप,फेसबुकवर ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद फेसबुक, व्हाटसअ्प मोबाईलधारकाने फिर्यादी यांचेशी मैत्री करुन,त्यांना भारतात गिफ्ट पाठविले आहे. त्याकरीता मोबाईलवरून ३०,०००/- रुपये एक्साईज चार्ज व फिर्यादी यांना भेटण्यासाठी स्वतः भारतात आला आहे. तसेच त्याचे सर्व सामान कस्टम विभागाने पकडले असुन,त्याला सोडविण्याकरीता त्याचे मोबाईलवरून कॉल करुन,फिर्यादी यांना येलोकार्ड एमीग्रेशन फी २१,०००/- रुपये भरण्यास सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून असे सर्व मिळुंन एकुण ५१,०००/- रुपेय सदर इसमाने स्वतःच्या फायद्या करीता ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास सांगुन,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) राजेश तटकरे ८३२९४७९९२० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ४३१/१९,भादविक ३६४(अ)३८६,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-२६ वर्षे,रा.भेकराईनगर,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | गणेश दिलीप मोडक,वय-२४,रा.वडकी गाव,ता.हवेली,जि.पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०१९ रोजी २०/०० वा.ते दि.१८/०५/२०१९ रोजी २०/०० वा.चे दरम्यान मंतरवाडी फाटया जवळ फुरसंगी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे किराणा दुकानात असताना,त्यांचे ओळखीचे गणेश मोडक याने फिर्यादी यांना दुकानाच्या बाहेर बोलावुन,गणेश मोडक व त्याचा साथीदार याने संगनमत करून,फिर्यादी यांना एक लाख रुपयेची मागणी केली. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना एक लाख रुपये देण्यास नकार दिला. तेव्हा गणेश मोडक याने त्याचेकडे असलेला पाण्यासारखा पदार्थ फिर्यादी यांचे तोंडावर टाकून,त्याचे गाडीतून एक लोखंडी कोयता काढुन,तो कोयत्या पाठीवर उलटा मारून,फिर्यादीस जबरदस्तीने त्यांचेकडील लाल रंगाच्या गाडीमध्ये बसवुन ब्रिजच्या अलिकडून फुरसुंगीकडे जाणाऱ्या रोडने सरळ जावुन मोकळया जागेत नेवुन,गणेश मोडक याने त्याचेकडील कोयता माझ्या गळयाला लावुन,प्रत्येक महिन्याला १ लाख रुपये खंडणी दयावी लागेल,जर तु खंडणी नाही दिली तर जीवे ठार मारण्याची धमकी देवुन शिवीगाळ केली. तसेच फिर्यादी यांचे खिशातील जबरदस्तीने ५ हजार रुपये काढुन घेवुन, त्यांचे गाडी मध्ये डांबुन ठेवुन,त्यांना कोयत्याची भिती दाखवुन,प्रत्येक महिन्याला १ लाख रुपयेची मागणी केली. (फिर्यादी यांनी इतर किराणा दुकानादार सदस्यां सोबत चर्चा करुन आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. के.एस.लोंढे ८९७५०२०५०० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३७२/१९,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | राजीव जगवानी,वय-३५ वर्षे,रा.कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपी** | घरकाम करणारा कामगार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०१९ रोजी सकाळी ११/०० ते १५/०० वा.चे दरम्यान मॅरीगोल्ड सोसायटी, कल्याणीनगर,पुणे |
| **तपशिल** | यसातील फिर्यादी यांचे घरा मध्ये घरकाम करणारा यातील नमुद इसमाने,फिर्यादी यांची नजर चुकवुन,फिर्यादी यांचे वडीलांचे बेडरुमचे कपाटा मधील ड्रॉव्हर मधुन ३,४०,०००/- रुपये रोख रक्कम चोरी करुन घेऊन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरीक्षक, बलभिम ननवरे ८२०८०८९४४७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १९९/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | रोहित कारंडे,वय-२७,रा.कवठेमहाकाळ,जि.सांगली |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१९ रोजी सकाळी १०/४५ ते १२/०० वा.चे दरम्यान वारजे ते पुणे स्टेशन पीएमपी बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वारजे ते पुणे स्टेशन पीएमपी बस प्रवास करीत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने प्रवासा दरम्यान बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे बॅग मधील रोख ६२,५००/- रक्कम व सोन्याचे दागिने असा सर्व मिळुन एकुण २,३२,५००/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जमदाडे ९८२२०३०७६९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**